# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र./मनपा/उदयान/मिरारोड/ 165 /२०२५-२६** **दिनांकः 11/06/२०२५**

**प्रति,**
**सिस्टम मॅनेजर,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विषय — संकेत स्थळावर जाहिर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**
**(विकास कामात बाधित व धोकादायक झाड मुळासहित काढणेकामी)**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामात बाधित झाडे मुळासहित काढणेकामी सोबत जोडलेली जाहिरात नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत :- जाहिर नोटीस प्रत.

**(नागेश विरकर)**
**वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान विभाग
दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र./मनपा/उदयान/मिरारोड/ 165 /२०२५-२६** **दिनांक: 11 /06 /२०२५**

**// जाहीर नोटिस सुचना //**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, प्रत्यक्ष पाहणी केली असता झाडे काढणे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १ | जांभुळ | २० ते २५ फुट | ०१ | १५ वर्ष | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र.३२६, इंद्रलोक या जागेत जलकुंभ बांधणेचे काम सुरु आहे. सदर जलकुंभाच्या बाजुलाच बांधकाम विभागामार्फत अभ्यासिका बांधणेचे काम सुरु आहे. त्यामुळे जलकुंभाकडे जाणाऱ्या रस्त्यामध्ये ०१ नग जांभळाचे झाड अडथळा निर्माण करीता आहे. तरी या कारणास्तव सरदचे बाधित झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. **कार्यकारी अभियंता (पा.पु) यांचे दि.३०/०५/२०२५ रोजीचे पत्र** |
| २ | रेन्ट्री | ३० ते ३४ फुट | ०१ | ३१ वर्ष | सदरचे झाड भाईंदर (प.) ६० फुट रोड, देवसृष्टी टॉवर समोर येथिल मनपा रोडवर झुकलेल्या स्थितीत आहे. सदर रस्त्यावरती वाहनांची ये-जा व वर्दळ असते. जोराच्या वा-याने झाड पडून जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी या कारणास्तव सदरील झाड काढणे आवश्यक आहे. **श्री.योजना जाधव, ठेका उद्यान अधिक्षक यांची दि.१०/०६/२०२५ रोजीची प्रत्यक्षपाहणी** |
| ३ | रेन्ट्री | ३० ते ३४ फुट | ०१ | २१ वर्ष | सदरचे झाड भाईंदर (प.) ६० फुट रोड, रिद्धी सिद्धी टॉवर, सर्वोदय बेकर्स शॉप समोर येथिल मनपा रोडवर असुन झाडाच्या मुळ्या जमिनीवरती आलेल्या असुन मनपा रोडच्या दिशेने धोकादायकरित्या झुकलेले आहे. सदर रस्त्यावरती वाहनांची ये-जा व वर्दळ असते. जोराच्या वा-याने झाड पडून जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी या कारणास्तव सदरील झाड काढणे आवश्यक आहे. **श्री.योजना जाधव, ठेका उद्यान अधिक्षक यांची दि.१०/०६/२०२५ रोजीची प्रत्यक्षपाहणी** |
| ४ | पिंपळ (पाखड) | १५ ते १८ फुट | ०१ | १६ वर्ष | भाईंदर (पू.) साई बाबा नगर, नवघर रोड येथिल अनंत विजय को.ऑ.हौ.सो.लि. या सोसायटीच्या आवारात ०१ नग पिंपळाचे झाड धोकादायकरित्या उंच वाढलेले असून सदरचे झाड सोसायटीच्या संरक्षक भिंतीवर असुन भिंतीला तडे जात आहेत. जोराच्या वा-याने झाड पडून जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदर झाड अडगळीच्या जागेत उगवले असुन पुर्नरोपन करणे शक्य नाही. या कारणास्तव सदरचे झाड मुळासकट काढणे आवश्यक आहे. **अनंत विजय को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि.१६/०५/२०२५ रोजीचे पत्र.** |
| | | **एकूण** | **०४** | | |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उद्यान विभाग), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा dc1garden@mbmc.gov.in किंवा garden@mbmc.gov.in या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**(नागेश विरकर)**
**वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**